प्रेस नोट

पुणे रेल्वे स्टेशन ,खंडाळा ,जांबरुख ,पळसधरी येथे जबरी चोऱ्या करणाऱ्या आणि लॅपटॉप चोऱ्या करणाऱ्या परराज्यातील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे यांनी केले जेरबंद

..........................................................................................

पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे हददीमध्ये खंडाळा ,जांबरुख ,पळसधरी येथे जबरी चोऱ्या येथे जबरी चोऱ्यांचे प्रमाणे वाढले असल्याने मा.पोलीस अधीक्षक सो, श्री.श्रीकांत धिवरे यांनी स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे येथील पोलीस निरीक्षक इरफान शेख यांना स्थानिक गुन्हे शाखेतील पथकास जबरी चोऱ्यांना आळा घालण्यासाठी पुणे रेल्वे स्टेशन ते कर्जत पर्यंत पथकाची नेमणुक करण्यास सांगितली होती.त्याप्रमाणे पो.नि.इरफान शेख ,स.पो.निरी.बाळासाहेब अंतरकर ,सहा,पो.फौ.सुहास माळवदकर ,सुनील माने ,पो.हवा.अमरदिप साळुंके,संतोष जगताप ,इम्तीयाज अवटी ,शिवाजी सावंत ,रुपेश पवार ,पो.ना.सचिन राठोड ,चालक दिलीप खोत आणि राम येवतीकर असे पथक नेमण्यात आले होते.

या पथकाने मागील दोन महिन्यामध्ये पुणे रेल्वे स्टेशन ते कर्जत दरम्याण झालेल्या जबरी चोऱ्यांचा सखोल तपास करुन तुर्भे रेल्वे स्टेशन येथे सापळा रचुन रवी सिंग तेजपाल सिंग लुभाणा ,वय.२७ वर्षे रा. ९१,मयुर विहार फेज १ ,त्रिलोक पुरी ,२०/५४, न्यु दिल्ली सध्या.सानपाडा रेल्वे स्टेशन फिरस्ता यास दि.१६.७.२०२३ रोजी १६.०७ वा.अटक करुन त्याचेकडे सखोल तपास केला असता सदरचा आरोपी हा दिल्ली येथील राहणारा असुन लोणावळा ,खंडाळा ,जामरुख रेल्वे स्टेशन येथे रेल्वेतील महिला प्रवाशांच्या बॅग ,गळयातील मंगळसुत्र खिडकीतुन हात घालुन खेचुन चोरुन नेले असलेबाबत कबुल केले.त्याप्रमाणे आरोपीकडे सखोल व कौशल्यपुर्ण तपास करुन नवी मुंबई येथुन सोन्याचे दागिने जप्त केले असुन खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं व कलम | जप्त माल |
|---|---|---|---|
| १ | पुणे रेल्वे पोलीस ठाणे | २७८/२०२३, भा.द.वि. कलम ३९२ | १)००/— रू किं चॉकलेटी व ब्राउन रंगाची लेदरची हॅन्डबॅग २)२७,०००/—रू किंमतीचा ओपो कंपनीचा ३) ९००००/— रू किंमतीची सोन्याची १५ ग्रॅम वजनाची नेकलेसची चैन |
| २ | पुणे रेल्वे पोलीस ठाणे | गु.र.नं. १३३/२०२३ भा.द.वि. ३९२ | २८०००/— रू किंमतीची ५ ग्रॅमची सोन्याची लगड |
| ३ | पुणे रेल्वे पोलीस ठाणे | गु.र.नं. २०९/२०२३ भा.द.वि. ३९२ | ७२,०००/— रू किंमतीची १५ ग्रॅमची सोन्याची लगड |

तसेच पुणे रेल्वे स्टेशन येथे रात्रीच्या वेळी लॅपटॉप बॅग चोऱ्यांचे प्रमाण वाढले असल्याने पो.नि.इरफान शेख ,सुनील माने ,पो.हवा.अमरदिप साळुंके,इम्तीयाज अवटी ,पो.ना.सचिन राठोड ,चालक दिलीप खोत ,आर पी एफ पुणे ठाणे प्रभारी निरीक्षक श्री रघुवंशी आणि स्टाफ यांनी लॅपटॉप चोऱ्यांचा सखोल तपास करुन पुणे रेल्वे स्टेशन येथे सापळा रचुन आरोपी नामे शिवकुमार रेटामल्लाई ,वय.५१ वर्षे रा. मिल कॉलनी ,रामजी नगर ,जि.तिरुचेरापल्ली ,रा.तामीळनाडु यास दि.६.८.२०२३ रोजी १८.३० वा.अटक करुन त्यास व्दिभाषी

मार्फत विश्वासात घेवुन सखोल तपास केला असता सदरचा आरोपी श्री तिरुचेरापल्ली [illegible]
राहणारा असुन त्याने मागील ७ महिन्यामध्ये पुणे रेल्वे स्टेशन येथील रेल्वेतील प्रवाशांच्या झोपेचा फायदा घेवुन
[illegible] आरोपीकडे कौशल्यपुर्ण तपास करुन तिरुचेरापल्ली ,जि.तामीळनाडु येथुन ४ महागडे लॅपटॉप जप्त केले असुन खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं व कलम | जप्त माल |
|---|---|---|---|
| १ | पुणे रेल्वे पोलीस ठाणे | ४६७/२०२३, भा.द.वि. कलम ३७९ | १७,०००/– रु किमतीचा ,लिनिवो कंपनीचा लॅपटॉप ,काळया रंगाचा , |
| २ | पुणे रेल्वे पोलीस ठाणे | गु.र.नं. १२७/२०२३ भा.द.वि. ३७९, ३४ | १,५०,००० /– रु किमतीचा ,लिनोव्हो Think Pad , काळया रंगाचा लॅपटॉप |
| ३ | पुणे रेल्वे पोलीस ठाणे | गु.र.नं. २९६/२०२३ भा.द.वि. ३७९, ३४ | २१,५०० /– रु किमतीचा , HP , कंपनीचा सिल्व्हर रंगाचा लॅपटॉप |
| ४ | पुणे रेल्वे पोलीस ठाणे | गु.र.नं. ४३८/२०२३ भा.द.वि. ३७९, ३४ | ३) १,२५,००० /– रु किमतीचा , Dell , ग्रे रंगाचा लॅपटॉप (पुणे लो.पो.ठाणे गु.र.नं.४३८/२३ ,भा.द.वि.क.३७९) |

तरी वरील प्रमाणे परराज्यातील आरोपींकडुन सखोल तपास करुन ३ जबरी चोऱ्या उघडकीस आणुन २,१७,००० रु किमतीचे सोन्याचे दागिने आणि ३,१३,००० रु किमतीचे ४ लॅपटॉप जप्त करण्यांत आले आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक रा़ो लोहमार्ग पुणे ,श्री.श्रीकांत धिवरे ,भा.पो.से.यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.इरफान शेख ,स.पो.निरी.बाळासाहेब अंतरकर ,सहा.पो.फौ.सुहास माळवदकर ,सुनील माने ,पो.हवा.अमरदिप साळुंके,संतोष जगताप ,इम्तीयाज अवटी ,शिवाजी सावंत ,रुपेश पवार ,पो.ना.सचिन राठोड ,चालक दिलीप खोत आणि राम येवतीकर यांनी केली आहे.

पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा,
लोहमार्ग, पुणे